शहर अभियंता कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र.:- ७१६०
दिनांक :- १२/१०/२०२६.

कार्यालयीन परिपत्रक

विषय :- पुणे महानगरपालिकेत नव्याने समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील पाणीपुरवठा व्यवस्थेबाबत.

संदर्भ :- १) शहर अभियंता कार्यालयाकडील कार्यालयीन परिपत्रक जा.क्र. शअजा/ज/१५३३५ दि. २७.०३.२०२६

२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र. ६/५२१ दि. ७.१०.२०२६

पुणे महानगरपालिका हद्दीत दि. ४.१०.२०१७ व दि. ३०.६.२०२१ रोजी नव्याने समाविष्ट झालेल्या एकूण ३२ गावांमधील प्राप्त विकसन व बांधकाम प्रस्तावांमध्ये विकसकामार्फत संबंधित प्रकल्पाचे विकसन पूर्ण झालेनंतर निवासी/व्यापारी वापरासाठी पुणे महानगरपालिकेमार्फत पुरेसा पाणी पुरवठा पुरेशा दाबाने उपलब्ध होईल तोपर्यंत विकसकामार्फत पुरेसा पाणीपुरवठा सदर प्रकल्पास करणार असे हमीपत्र विकसक पुणे महानगरपालिकेस सादर करणेबाबत संदर्भ क्र. १ नुसार कार्यालय परिपत्रक प्रसृत करण्यात आले आहे. परंतु सदर हमीपत्राच्या मसुद्यामध्ये काही उणीवा/त्रुटी असल्याचे निदर्शनास येत आहे. तसेच सध्या तेथील रहिवाशांकडून पाणीपुरवठ्याबाबत तक्रारींचे प्रमाण वाढले असून हमीपत्रातील त्रुटींमुळे विकसकांची जबाबदारी पूर्णपणे निश्चित करता येत नसल्याने सदर भागातील नागरिकांच्या रोषास पुणे महानगरपालिकेस समोरे जावे लागत असून कायदेशीर प्रश्नही निर्माण झाले आहेत.

सदर हमीपत्रामध्ये आवश्यक बदल करुन हमीपत्राच्या सुधारित मसुद्यास संदर्भ क्र. २ अन्वये मा. महापालिका आयुक्त यांनी मान्यता दिली आहे. सबब यापुढे सदर सुधारित हमीपत्र संबंधित विकसकांमार्फत बांधकाम परवानगी प्रस्तावासोबत घेण्यात यावे.

तसेच सदर ३२ गावांमधील पुणे महानगरपालिकेस उपरोक्त सुधारित हमीपत्र सादर करुन विकसकामार्फत प्राप्त विकसन व बांधकाम प्रस्तावांना देण्यात आलेल्या मान्य प्रस्तावांची यादी पुणे महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत असून वेळोवेळी सदर यादी अद्ययावत करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणेची दक्षता संबंधित सर्व कार्यकारी अभियंता यांनी घ्यावयाची आहे.

(अनिरुध्द पावसकर)
शहर अभियंता
पुणे महानगरपालिका

सोबत :- हमीपत्राचा सुधारित नमुना.

प्रत :-

१) मा. महापालिका आयुक्त, पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी सादर

२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि/इ/ज), पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहितीसाठी सादर

३) मा. मुख्य अभियंता (पाणीपुरवठा), पुणे महानगरपालिका

४) मा. अध्यक्ष, क्रेडाई पुणे मेट्रो

५) मा. अध्यक्ष, National Real Estate Development Council मेट्रो

६) सर्व कार्यकारी अभियंता, बांधकाम विकास विभाग, पुणे महानगरपालिका

पुणे महानगरपालिकेमध्ये समाविष्ट ३२ गावांसाठी पाणीपुरवठ्याबाबत सुधारित हमीपत्राचा नमुना

मिळकतीचे वर्णन :-

वर उल्लेख केलेल्या मिळकतीबाबत बांधकाम रेखांकन/बांधकाम नकाशे मंजूर करणेसाठीचा प्रस्ताव पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागास सादर केला आहे. पुणे महानगरपालिकेकडून पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकत नाही याची माहिती आम्हाला देण्यात आली असून याला पर्याय म्हणुन बोअरद्वारा पाणी उपलब्ध करुन घेण्याची किंवा टँकरद्वारे पाणी मिळण्याची व्यवस्था आम्ही मंजूर बांधकाम पूर्ण होईपर्यंत किंवा मिळकतीस पुणे महानगरपालिकेचा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत स्वखर्चाने करीत आहोत व त्या संबंधी आवश्यकता असल्यास वरिष्ठ भूवैज्ञानिक अधिकारी, भूजल सर्वेक्षण आणि विकास योजना (G.W.S.& D.A) या कार्यालयामार्फत प्रमाणपत्र आणुन देण्याची कार्यवाही करणे आमच्यावर बंधनकारक राहील. सदर मिळकतीस करावयाच्या पाणी पुरवठ्याबाबत पुढीलप्रमाणे अटी/शर्ती आमचेवर बंधनकारक राहतील.

१) बांधकाम परवानगी, पूर्णत्वाचा दाखला, आणि भोगवटा पत्राच्या सर्व टप्प्यांवर पाणीपुरवठ्याची हमी आमची राहील. आवश्यकतेनुसार बोअरवेल, टँकर, तात्पुरती टाकी, देखभाल, आणि पाणीखर्च पूर्णतः आमचा राहील.
२) किमान 3 वर्षे किंवा मनपातर्फे प्रत्यक्ष पाणीपुरवठा सुरू होईपर्यंत, यापैकी जो उशिरा येईल तोपर्यंत, विषयांकीत मिळकतीस/प्रकल्पास पाणीपुरवठा करणे आमची जबाबदारी राहील.
३) खरेदीखत, अलॉटमेंट लेटर, आणि सहकारी सोसायटी नोंदणी कागदपत्रांत "पाणीपुरवठ्याची सद्यस्थिती आणि विकसकाची जबाबदारी" हा मजकूर समाविष्ट करु.
४) विहीत कालावधीपूर्वी पाणीपुरवठा बंद केल्यास थेट दंड, परवानगी निलंबन, नवीन परवानगी रोखणे, आणि गंभीर प्रकरणात फौजदारी कारवाई होऊ शकते याबाबत आम्हास कल्पना आहे.
५) हमीपत्र सार्वजनिक संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

इमारतीमधील गाळ्यांचे बुकींग करताना करण्यात येणाऱ्या करारनाम्यामध्ये पाणी पुरवठ्याची वरिलप्रमाणे विशेष बाब म्हणुन नमूद करुन घेण्याची जबाबदारी राहील. जागेवरील परिस्थितीची जाणीव करुन दिल्यानंतर सुध्दा या ठिकाणी होणाऱ्या बुकिंगनंतर नियोजित गाळेधारकांना पाणीपुरवठा अपुरा झाल्यास पुणे महानगरपालिकेचा पाणीपुरवठा सुरु होईपर्यंत पुरेसा पाणी पुरवठा करण्यासाठी व्यवस्था करण्याची जबाबदारी आमच्यावर राहील, याबाबत पुणे महानगरपालिकेस तोशिष लागू देणार नाही.

टँकरद्वारे किंवा बोअरद्वारे मिळणाऱ्या पाण्याचे नमूने वेळोवेळी प्रयोगशाळेतून तपासून आणणे व त्या रिपोर्टनुसार पाणी योग्य आढळल्यास स्वखर्चाने पाणी वापरण्यात येईल याची आम्ही काळजी घेऊ.

सदरची योजना संपूर्णरित्या प्रवर्तक/मालक या नात्याने आम्ही अन्य कोणासही दरम्यानचे काळात विकल्यास नविन मालक/प्रवर्तकास या हमीपत्रातील सर्व बाबींची लेखी कल्पना देऊन त्याचा समावेश करारनाम्यात करण्यात येईल.

सदर हमीपत्राद्वारे पाणीपुरवठा करताना आवश्यक सर्व शासकीय, निमशासकीय आस्थापनांची परवानगी/दाखले घेण्याची तसेच प्रचलित नियम, तरतुदी यांचे अनुपालन करण्याची जबाबदारी लिहुन देणार त्यांचे वालीवारस, असायनीज यांची राहील.

सदर हमीपत्रानुसार प्रकल्पाच्य प्रत्येक टप्प्यावर सुरळीत पाणीपुरवठा न झाल्यास अथवा त्यासंबंधी कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास योग्य ती कार्यवाही करण्याची मुभा पुणे महानगरपालिकेस राहील याची लिहून देणार यांना कल्पना आहे.

हे हमीपत्र आमच्या वालीवारस, असायनीज, हस्तांतरण प्राप्तकर्ता, इ. वर बंधनकारक राहील.

सदर जागेचे संदर्भातील कोणासही जागा विकल्यास करारामध्ये या हमीपत्राचा समावेश करण्यात येईल व ही करारनाम्यातील विशेष बाब म्हणुन समजण्यात येईल.

वरील हमीपत्र आम्हास आजमितीस ज्ञात माहिती अनुसार आम्ही राजीखुशीने दिनांक ------ ------ रोजी लिहून दिले असे.

ठिकाण:
दिनांक:

हमीपत्र लिहून देणार

विकसक / मालक स्वाक्षरी